# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : **chandrapur.rdc@gmail.com** फोन क्रमांक – 07172-250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 645 दिनांक :- 30 जुन, 2020

---

**संदर्भ** :- 1. भारत सरकार, गृह विभाग, यांचे आदेश No. 40-3/2020-DM-I(A) दि. 24.03.2020.

2. या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/239 दिनांक 20.03.2020.
3. या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/242 दिनांक 22.03.2020.
4. या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/245 दिनांक 23.03.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/257 दिनांक 25.03.2020.
6. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश दिनांक 13.04.2020.
7. केंद्र शासन, गृह विभाग, नई दिल्ली यांचे आदेश 40-3/2020-DM-I(A) दि. 15.04.2020.
8. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 15.04.2020.
9. या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/323 दिनांक 15.04.2020.
10. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 17.04.2020.
11. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/349 दि. 20.04.2020.
12. केंद्र शासन, गृह विभाग, नई दिल्ली यांचे आदेश 40-3/2020-DM-I(A) दि. 24.04.2020.
13. केंद्र शासन, गृह विभाग, नई दिल्ली यांचे आदेश 40-3/2020-DM-I(A) दि. 01.05.2020.
14. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 02.05.2020.
15. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/424 दि.03.05.2020.
16. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 05.05.2020.
17. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/461 दि.10.05.2020.
18. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 15.05.2020.
19. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 17.05.2020.
20. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/473 दि..17.05.2020.
21. केंद्र शासन, गृह विभाग, नई दिल्ली यांचे आदेश 40-3/2020-DM-I(A) दि. 30.05.2020.
22. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 31.05.2020.
23. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/518 दि.01.06.2020.
24. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 25.06.2020.
25. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/638 दि.25.06.2020.
26. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/639 दि.27.06.2020.
27. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 29.06.2020.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

-: आदेश :-

फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये मनाई आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यांतर्गत कोरोना विषाणुचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभागाव्दारे कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता साथरोग प्रतिबंध कायदा, 1897 लागु करुन त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आली आहे व त्याकरिता अधिसुचना व नियमावली निर्गमित करण्यात आल्या आहेत.

आणि ज्याअर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोविड-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि. 13.02.2020 पासुन लागु करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्याशिवाय भारत सरकार, आरोग्य मंत्रालय, महाराष्ट्र सरकार, आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केलेप्रमाणे कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमांचे आयोजन केल्यास या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंध उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 144 खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी संदर्भ क्रं. 21 च्या आदेशाने केद्र शासनाने व संदर्भ क्रं. 22 च्या आदेशाने राज्य शासनाने आदेश निर्गमीत केला असल्याने माझे संदर्भिय क्रं. 23 वरील आदेशान्वये दिनांक 01.06.2020 ते दिनांक 30.06.2020 पावेतो जिल्हयात प्रतिबंध आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संदर्भिय क्रं. 27 अन्वये, कोरोना विषाणुचा वाढता प्रकोप लक्षात घेता सदरचे प्रतिबंधात दिनांक 01.07.2020 ते दिनांक 31.07.2020 पावेतो वाढ केलेली आहे.

त्याअर्थी **मी. डॉ. कुणाल खेमनार, जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर** फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) चे कलम 144 नुसार मला प्राप्त अधिकारान्वये असे आदेश जाहीर करतो की, जिल्हयात मोठया प्रमाणात लोकांचा समुह एकत्र जमवु न देता व कोरोना विषाणुचा संसर्ग टाळण्यासाठी संपुर्ण चंद्रपूर जिल्हयामध्ये घेण्यात येणारे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मीक, क्रिडा विषयक प्रदर्शने व शिबीरे, सभा, मेळावे, जत्रा, यात्रा, रॅली, धरणे आंदोलन, इत्यादी कार्यक्रमास मनाई करण्यात येत आहे. तसेच जनतेसही एकत्र जमण्यास

मज्जाव करण्यात येत आहे. तसेच संबधीत विभागाकडून मोठया प्रमाणात लोक एकत्र येतील अश्या कोणत्याही कार्यास परवानगी देण्यात येऊ नये तसेच खालील सुचनांसह सदरचा प्रतिबंधात्मक आदेश लागु करीत आहे :-

1) **प्रतिबंधात्मक बाबी :-**

i) **प्रवास :-**

- आंतरराज्यीय व आंतरजिल्हा विना परवाना प्रवासी वाहतुकी करीता बंद असेल.
- परराज्यात/राज्यांतर्गत (चंद्रपूर जिल्हयातुन इतर जिल्हयात) प्रवासाकरिता **https://covid19.mhpolice.in** यावर ऑनलाईन अर्ज करावा.
- चंद्रपूर जिल्हयाबाहेरुन सक्षम अधिका-यांची परवानगी घेऊन जिल्हयात प्रवेश करणा-या व्यक्तींना आरोग्य विभाग यांचेकडून देण्यात आलेल्या निर्देशानुसार 14 दिवस होम क्वारंटाईन किंवा संस्थात्मक विलगीकरण करण्यात येईल. होमक्वारंटाईन किंवा संस्थात्मक विलगीकरण करण्यात आलेली व्यक्ती इतरत्र फिरतांना आढळल्यास रु. 2000/- दंड व मास्कचा वापर न केल्यास रु. 200/- इतका दंड आकारण्यात येईल व संबधीत व्यक्तीविरुध्द भारतीय दंड संहिता चे कलम 188, 269, 270, 271 नुसार कार्यवाही करण्यात येईल.
- 65 वर्षावरील व्यक्ती, Co-morbidities व्यक्ती व 10 वर्षाचे आतील बालके, गर्भवती महिला यांनी अत्यावश्यक गरजा पुर्ण करण्यासाठी व वैद्यकीय उद्देशाशिवाय घराबाहेर निघु नयेत.
- **अत्यावश्यक सेवेतील शासकीय कर्मचारी/अधिकारी व संबधीत व्यक्ती यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या हालचालीस रात्री 09.00 ते सकाळी 05.00 या वेळेत प्रतिबंध राहील.**

**ii)** सार्वजनिक स्थळी पाच किंवा पाच पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमा होऊ नये. परंतु जिथे 5 पेक्षा कमी व्यक्ती एकत्र येत असेल त्यावेळी त्यांचेत कमीत-कमी 6 फुट (2 Gaz ki doori) इतके सामाजिक अंतर राखणे आवश्यक राहील.

**iii)** सार्वजनिक ठिकाणी/स्थळी पान, तंबाखु, धुम्रपान करणे इत्यादीस प्रतिबंधीत राहील.

**iv)** धार्मीक स्वरुपाचे समुपदेशन, धर्म परिषद, धार्मीक गर्दीचे आयोजन करु नये.

**v)** कोरोना विषाणु (कोव्हिड-19) च्या अनुषंगाने कोणत्याही नागरीकांनी समाजात, जनमानसात अफवा, अपप्रचार व भिती व्हॉटसअॅप, फेसबुक, व्टिटर, वृत्तपत्र, सोशल मिडीया व होर्डिंग इत्यादींवर प्रसारीत करु नये. तसेच अधिकृत माध्यमाव्दारे माहिती न घेता दिशाभुल करणारी माहिती प्रसार माध्यमांवर प्रसारीत करु नये.

**vi)** कोरोना विषाणु (कोव्हिड-19) चे अनुषंगाने घोषीत करण्यात आलेल्या क्वारंटाईन स्थळांच्या 100 मीटर परिसरांतर्गत एकत्रित येण्यास व हालचाल करण्यास निर्बंध घालण्यात येत आहे..

vii) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे मिरवणुक, रॅली, सामुहिक कार्यक्रम, समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव, उरुस, जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रीडा व इतर सर्व स्पर्धा, आंदोलने इ. यांना मनाई राहील.

viii) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यक्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशा सर्व प्रकारची कृत्ये जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, देशांतर्गत व परदेशी सहली इ. यांचे आयोजन करण्यासाठी मनाई राहील.

ix) जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यक्षेत्रात असणा-या शॉपींग कॉम्प्लेक्स, मॉल्स, सुपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब/पब, क्रीडांगणे, मैदाने, जलतरण, तलाव, उद्याने, सिनेमागृहे, नाटयगृहे, शाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी वर्ग, व्यायामशाळा, संग्रहालये, गुटखा- तंबाखु, पान विक्री, इत्यादी बंद राहील.

x) निवासाची सोय असलेले सर्व हॉटेल/लॉज/खाजगी विश्रामगृह बंद राहतील.

xi) सामाजिक अंतर ठेवुन दैनंदिन बाजार भरविता येईल परंतु आठवडी बाजार भरविता येणार नाही.

2) <u>जिवनावश्यक असलेल्या पुढील बाबीं कार्यरत राहतील :-</u>

i) अत्यावश्यक किराणा सामान, दुग्ध/दुग्धोत्पादने, फळे व भाजीपाला, पार्सल स्वरुपात काऊंटर तसेच इतर मार्गांनी विक्री/वितरण व वाहतुक करण्यास परवानगी राहील.

ii) जिवनावश्यक खाद्य पदार्थ, किराणा, दुध, दुग्धजन्य पदार्थ विक्री व वाहतुक, ब्रेड, फळे, भाजीपाला, अंडी, मांस, मासे, बेकरी, पशु खाद्य यांची **किरकोळ विक्री सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपावेतो सुरु राहतील. परंतु दुकान/आस्थापना यामध्ये एकाच वेळेस 5 पेक्षा जास्त ग्राहक उपस्थित राहणार नाहीत याची खबरदारी घ्यावी त्याचप्रमाणे आपले दुकान/आस्थापना समोर आणि फुटपाथवर कोणत्याही प्रकारचे साहित्य ठेवता येणार नाही.**

iii) खाद्य पदार्थ, किराणा, दुध, ब्रेड, फळे, भाजीपाला,अंडी, मांस, मासे, यांची वाहतुक व साठवण.

iv) अत्यावश्यक वस्तुंची पुरवठा साखळी आणि वाहतुक.

v) पार्सल स्वरुपात सुविधा उपलब्ध करुन देण्याचे अटीवर उपहारगृहे, खाद्यगृहे, घरगुती खानावळ, स्वीट मार्केट, फरसाण सेंटर व चहा-नास्ता सेंटर सुरु राहतील तथापी प्रत्यक्ष दुकानात ग्राहकांसाठी बैठक व्यवस्थेस मनाई असेल.

vi) पावसाळी ऋतु संबधीत साहित्य जसे छत्री, रेनकोट, प्लॉस्टीक शिट/कवर यांचा समावेश जिवनाश्यक वस्तु मध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे सदर साहित्याची विक्री व वितरणाबाबत वेळ वरील परिच्छेद क्रं. 2 मधील (ii) प्रमाणे राहतील.

vii) वरील आस्थापना/दुकाने यांनी कोरोना विषयक दिशानिर्देशाचे जसे सामाजिक अंतर राखणे, निर्जंतुकीकरण, हॅण्डसॅनिटायजर्स न ठेवणे इ. गोष्टीचे पालन न केल्याचे आढळुन आल्यास प्रशासनाकडून सदरील आस्थापना/दुकाने तात्काळ प्रभावाने बंद करण्यात येईल.

3) **सार्वजनिक सुविधा संबधाने पुढील बाबीं कार्यरत राहील व त्यांना वेळेचे बंधन लागु राहणार नाही:-**

i) ज्या आस्थापना (उदा. माहिती व तंत्रज्ञान उद्योग) ज्यांच्याकडे देश व परदेशातील अति महत्वाचा (Critical-National & International Infrastructure) उपक्रमांची जबाबदारी आहे व सदर बंद राहिल्याने अशा उपक्रमांच्या प्रक्रियेला बाधा येवु शकते असे सर्व संबधित उपक्रम सुरु राहु शकतील, (परंतु यादृष्टीने सदर आस्थापना कार्यरत ठेवण्याच्या आवश्यकतेबाबत जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांना विशेषरित्या कळविणे बंधनकारक आहे.)

ii) प्रसारमाध्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियतकालिके, टीव्ही न्युज चॅनेल इ.) कार्यालय.

iii) किमान मनुष्यबळासह बँका/एटीएम, कॅश लॉजिस्टीक आणि कॅश ट्रॉन्झक्शन व अन्य संबधीत सेवा.

iv) मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे.

v) रुग्णालये, औषधालय, चष्माची दुकाने, औषधांचे दुकाने, औषधांचे कारखाने, विक्रेते आणि वाहतुक.

vi) पेट्रोल पंप, एलपीजी गॅस, ऑईल एजन्सीज यांचे वितरण, विक्री, साठवणुक व त्यांच्याशी संबधित वाहतुक.

4) **शेती विषयक उत्पादन/सुविधा/आस्थापना संबधाने पुढील बाबीं कार्यरत राहतील :-**

i) सर्व प्रकारचे शितगृहे / वखार, गोदामा संबधीत सेवा / घाऊक वितरणासाठी आणि सदर बाबींशी संबधीत पुरवठा साखळी.

ii) कृषी उत्पादन व किमान आधारभुत किंमत यांचेशी संबधीत कार्य करणारी कृषी उत्पन्न बाजार समिती वा राज्य शासनातर्फे अधिकृत असलेले मंडी/बाजार विशेषत: कापुस, तुर व धान खरेदी, विक्री आस्थापना/दुकाने.

iii) शेतकरी व शेत मजुर यांचे कडून करण्यात येणारी शेती विषयक कामे मासेमारी व मस्त्यव्यवसाय संबधी सर्व कामे व शेती विषयक औजारे/यंत्र विक्री व दुरुस्ती संबधीत मान्यताप्राप्त दुकाने / आस्थापना (किमान मनुष्यबळासह).

iv) शेती संबधीत यंत्रे/अवजारे चालविण्यासाठी आवश्यक असणारा मजुर वर्ग/ केंद्र (Custom Hiring Centres - CHC).

v) शेतमाल आणि अन्य वस्तुंची आयात-निर्यात आणि वाहतुक.

vi) राज्यांतर्गत / आंतरराज्यीय कृषी/फलोत्पादन संबधीत अवजारे/यंत्रे जसे पेरणी/कापणी यांची वाहतुक.

vii) खते, किटकनाशके व बी-बियाणे यांचेशी निगडीत उत्पादन व पॅकजींग आणि किरकोळ विक्री संबधीत उद्योग/आस्थापना/दुकाने संपुर्ण जिल्हयाकरिता सोमवार ते रविवार या दिवशी सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00 या वेळेत सुरु राहतील.

5) **ई-कॉमर्स व तंत्रज्ञान संबधाने पुढील बाबीं कार्यरत राहतील :-**

i) खाद्य पदार्थ, औषधे , वैद्यकीय उपकरणे यांसह इतर अत्यावश्यक वस्तुंचे ई-कॉमर्सव्दारे वितरण.

ii) अन्न/औषधी/वैद्यकीय उपकरणांची घरपोच सेवा देणा-या E-Commerce सेवा उदा. अॅमेझॉन, फ्लीपकार्ट, बिग बास्केट इत्यादी सुरु राहील.

iii) टेलीकॉम, टपाल, इंटरनेट, डेटासेवा यांसह माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सेवा.

iv) इलेक्ट्रीकल्स ट्रॉन्सफार्मर दुरुस्ती /स्वयंरोजगार करणारे कामगार/कारागीर जसे इलेक्ट्रीशियन, संगणक दुरुस्ती तंत्रज्ञ, प्लंबर, मोटर मेकॅनिक, कारपेंटर यांची घरपोच सेवा.

v) टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडर (TSPs) व यांच्यासाठी काम करणारे सरकारी/खाजगी/कंत्राटी क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांना टेलिकॉम सेवा सुरळीत सुरु राहावी याकरिता कोरोना प्रतिबंधात्मक क्षेत्र (Containment zone/Hotspot/सिलींग करण्यात आलेल्या इमारती व कॉम्प्लेक्स/लॉकडाऊन) इ. क्षेत्रामध्ये असलेल्या टेलिकॉम सबधीत यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती.

vi) ग्राम पंचायत स्तरावरील सरकार मान्य CSC सेंटर, आधार कार्ड केंद्र व महाऑनलाईन सेतु सुविधा केंद्र (जिल्हा प्रशासनाकडून घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार)

6) **वनविषयक संबधाने पुढील बाबीं कार्यरत राहतील :-**

i) अनुसूचित क्षेत्र व बिगर अनुसूचित क्षेत्र, FRA क्षेत्र यातील गौण वनउत्पादने गोळा करणे, प्रक्रिया करणे, वाहतुक व विक्री आणि वन व वनेत्तर क्षेत्रातील तेंदुपत्ता संकलन केंद्र, व गोदामापर्यंत त्याची वाहतुक.

ii) वनातील आगी रोखण्याकरीता जंगलात पडलेले लाकुड याची तात्पुरती/ विक्री आगारापर्यंतची वाहतुक.

7) **लग्न समारंभाकरिता पुढीलप्रमाणे परवानगी राहतील :-**

i) लग्न समारंभ (50 लोकांच्या उपस्थितीत) सामाजिक अंतर राखुन करण्यास परवानगी असेल. परंतु सदर परवानगी ही उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचेकडून प्राप्त करणे बंधनकारक राहील.

ii) विवाहाकरिता, 50 लोकांच्या कमाल मर्यादीत उपस्थितीत ज्यामध्ये प्रत्येकी 05 व्यक्तींचे बॅंड पथक / सुगम संगीत कलावंत यांची उपस्थिती ठेवुन खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल / सभागृह, घर व घराच्या परिसरात पार पाडण्यास परवानगी असेल.

8) **अंत्यविधीकरिता पुढीलप्रमाणे परवानगी राहतील :-**

i) अंत्यविधीकरिता सामाजिक अंतर राखुन 50 लोकांचे उपस्थितीस परवानगी राहील.

9) <u>प्रवास व प्रवासी वाहतुकी संबधाने पुढील बाबी कार्यरत राहतील :-</u>

i) जिल्हयांतर्गत प्रवासाकरिता बस सेवा 50 टक्के प्रवासी क्षमतेसह सामाजिक अंतर राखुन व निर्जंतुकीकरण उपाय राबवुन सुरु राहतील.

ii) जिल्हयांतर्गत प्रवास करण्यास (दुचाकी/चारचाकी वाहनाने) नागरीकांस कोणत्याही परवानगीची आवश्यकता राहणार नाही. परंतु चारचाकी वाहनाच्या बाबतीत वाहनचालकांसह केवळ 02 प्रवासी वैध राहील आणि वाहनामध्ये सॅनीटायजर्स ठेवुन प्रवास करणा-या व्यक्तीस मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील तसेच दुचाकी करिता केवळ दुचाकी चालक यांनाच वाहन चालविण्यास परवानगी असेल.

iii) महानगरपालिका/नगरपालिका, नगर पंचायत क्षेत्राकरिता प्रवासी वाहतुकीकरिता रिक्शा/ ॲटोरिक्शा चालक व दोन प्रवाश्यांसह रिक्शा/ॲटोरिक्शा ची वाहतुक सुरु राहील परंतु रिक्शा/ॲटोरिक्शा मध्ये सॅनिटायजर ठेवणे व मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल. सदर वाहतुक ही ग्रामीण क्षेत्राकरिता लागु राहणार नाही.

v) दुचाकी/चारचाकी/रिक्शा/ऑटोरिक्शा याव्दारे सायंकाळी 09.00 ते सकाळी 05.00 या कालावधीत प्रवास करता येणार नाही.

10) <u>शासकीय व खाजगी कार्यालय संबधाने पुढील बाबी कार्यरत राहतील :-</u>

i) जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय/महामंडळ कार्यालय/ सर्व प्रकारची खाजगी कार्यालये 100 टक्के कर्मचारी/अधिकारी यांचे उपस्थितीत सुरु राहतील. परंतु कोरोना-19 संबधाने राज्य शासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

ii) शैक्षणिक संस्था/शाळा/कॉलेज यामधील कार्यालय/कर्मचारी यांची अध्यापनाव्यतिरिक्त कामाकरिता जसे ई-लर्निग कन्टेंट, उत्तरपत्रिकांची तपासणी, निकालपत्र संबधीत कार्यवाही करण्याकरिता उपस्थितीस परवानगी असेल.

**<u>11).</u>** **<u>उद्योग संबधाने पुढील बाबी कार्यरत राहतील :-</u>**

i) सर्व प्रकारच्या शहरी व ग्रामीण भागातील औद्योगिक आस्थापना/वसाहती/युनिट सुरु राहतील परंतु परंतु कोरोना-19 संबधाने राज्य **शासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.**

**<u>12)</u>** **<u>बांधकाम संबधाने पुढील बाबी कार्यरत राहतील :-</u>**

**i) शहरी व ग्रामीण भागातील सर्व प्रकारची बांधकामे सुरु राहतील परंतु बांधकाम स्थळी कामगार उपस्थित राहील व कोणत्याही कामगारांस बाहेरुन आणण्यास परवानगी नसेल. परंतु कोरोना-19 संबधाने राज्य शासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.**

13) **लोकांच्या व्यक्तिगत कवायत बाबत पुढील बाबी कार्यरत राहील.**

i) क्रिडा संकुल आणि स्टेडियम मधील बाहेरील भाग तसेच सार्वजनिक मोकळया जागा नागरीकांना सामाजिक अंतर राखुन वैयक्तिक/व्यक्तीगत शारीरीक व्यायाम, कसरतीकरीता खुल्या राहतील. तथापी सदर जागेत प्रेक्षक किंवा गटांचा समुहास परवानगी नसेल.

ii) क्रिडा संकुल/ स्टेडियम यामधील आतील भागात कोणत्याही बाबींना परवानगी नसेल.

14) **सलुन/स्पा/बार्बर शॉप/केस कर्तनालय/ब्युटी पार्लर पुढील प्रमाणे कार्यरत राहतील :-**

- **सलुन/स्पा/केस कर्तनालय या आस्थापना सोमवार ते रविवार या दिवशी सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00 या वेळेत सुरु राहतील .**
- **यामध्ये केवळ हेअरकट, डाईंग हेअर, वॅक्सींग, थ्रेडींग करण्यास परवानगी असेल विशेषत: त्वचेसंबधी कोणत्याही बाबीस परवानगी असणार नाही. यासंबधी पत्रक दुकानाचे दर्शनी भागावर प्रसिध्द करावेत.**
- सदर आस्थापना/दुकानात काम करणा-या कर्मचारी यांनी हॅण्डग्लोव्हज, ॲप्रन व मास्क इत्यादी संरक्षणात्मक साहित्याचे वापर करणे बंधनकारक राहील तसेच दुकानात हॅन्डसॅनीटायजर चे वापर करुन एका वेळेस कमाल 1 च्या मर्यादेत सामाजिक अंतर राखुन ग्राहकांना प्रवेश द्यावा.
- प्रत्येक ग्राहकानंतर खुर्ची चे निर्जतुकीकरण करणे आवश्यक राहील. तसेच दुकानातील फर्शी, कॉमन क्षेत्र यांची दर 2 तासांनी नियमीतपणे निर्जतुकीकरण करणे आवश्यक राहील.
- ग्राहकांकरिता डिस्पोजेबल टॉवेल/नॅपकीन वापरणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे डिस्पोजेबल उपकरणे प्रत्येक सेवेनंतर स्वच्छ आणि निर्जतुकीकरण करणे आवश्यक राहील.
- खबरदारीचा उपाय म्हणुन वरील प्रमाणे करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती फलक दुकानाचे दर्शनी भागावर लावावी आणि दुकानात येणा-या प्रत्येक ग्राहकांची नोंद (नाव, संपुर्ण पत्ता, भ्रमनध्वनी क्रमांक) नोंदवहीत घेण्यात यावी.

15) **कामाचे ठिकाणी करावयाची अतिरिक्त कार्यवाही पुढीलप्रमाणे राहील** :-

- कामाचे ठिकाणी कार्यरत कर्मचारी यांना आवश्यकतेनुसार घरुनच काम करण्यास प्रोत्साहित करावे.
- कामाचे ठिकाणी कार्यरत कर्मचारी यांची कामाचे आवश्यकतेप्रमाणे त्यांचेकडील कामाचे तासाबाबत नियोजन करावे.
- कामाचे ठिकाणी थर्मल स्क्रिनींग, हात धुण्याची व्यवस्था, हॅन्डसॅनिटायजर्स ठेवणे बंधनकारक राहील.

- कामाचे ठिकाण, सामान्य सुविधा, मानवी संपर्कात येणारे सर्व बिंदु जसे दरवाजाचे हॅण्ड इ. शिफ्टच्या वेळेत निर्जंतुकीकरण करण्यात आलेले असल्याची खात्री करावी.
- कामाचे ठिकाणी कार्यरत कर्मचारी/कामगार यांचेत कमीत कमी 6 फुट (2 Gaz ki doori) इतके सामाजिक अंतर राखणे, कामगारांच्या पाळी दरम्यान पुरेसे अंतर, कर्मचारी/कामगार यांच्या जेवणाचे वेळीदरम्यानची विश्रांती दरम्यान सामाजिक अंतर पाळले जाणे आवश्यक राहील.

16) **उपरोक्त बाबीव्यतिरिक्त पुढील बाबी कार्यरत असण्यास परवानगी असेल :-**

i) बंदरावरुन होणारी वाहतुक, मनुष्यबळ, कंटेनर फ्राईट स्टेशनचे कार्यान्वयन, साठवणुक, कस्टम हाऊस एक्सचेंजची कार्यालय, रेल्वेच्या अत्यावश्यक सेवा.

ii) बेकरी आणि पाळीव प्राण्यांसाठीचे खाद्यपदार्थ आणि पशुवैद्यकीय सेवा.

iii) औषधी निर्मीती, डाळ व भात गिरणी, इतर जिवनाश्यक अन्नपदार्थ निर्मीती, साखर, दुग्धजन्य पदार्थ, पशुखाद्य, चारा निर्मीती घटक इत्यादी.

iv) टँकर्सव्दारे पाणी पुरवठा करणा-या सेवा.

v) पावसाळयापुर्वीची सर्व अत्यावश्यक कामे.

vi) अत्यावश्यक सेवांकरिता खासगी संस्थामार्फत पुरविल्या जाणा-या सुरक्षा सेवेसह अन्य सेवा देणा-या संस्था.

vii) अत्यावश्यक सेवांना किंवा कोरोना (कोव्हिड-19) प्रतिबंधासाठी होणा-या प्रयत्नांना मदत करणा-या खासगी आस्थापना.

viii) आंतरराज्यीय सीमा प्रवासी वाहतुकीकरीता बंद असेल परंतु सर्व प्रकारची मालवाहतुक, अत्यावश्यक मालवाहतुक नसली तरी परवानगी असेल. राज्यांतर्गत /आंतरराज्यीय मालवाहतुक समयी ट्रक चालक व अतिरिक्त एक व्यक्ती वैध कागदपत्रासह मालवाहतुक अत्यावश्यक असली अथवा नसली तरी सुरु राहील. त्याकरिता वेगळा परवाना आवश्यक नाही. मालवाहतुक करुन खाली ट्रकाची वाहतुक सुध्दा यामध्ये समाविष्ठ राहील.

ix) कोळसा व खनिज उत्पादन वाहतुक व खनिकर्माकरीता आवश्यक स्फोटके व इतर सेवांचा पुरवठा व वाहतुक.

x) जिवनावश्यक वस्तु व सेवा/अत्यावश्यक मालवाहतुक सेवा/ जिवनावश्यक वस्तु या व्यतिरिक्त सेवा या बाबींशी संबधातील पुरवठा साखळी सुरळीत राखण्याकरिता आणि शासकीय वाहने/रुग्णवाहीका /ट्रक /इतर वाहने इ. ची दुरुस्ती व देखभाल करण्याकरीताची गॅरेज/वर्कशॉप/स्पेअर पार्ट पुरवठादार यांची दुकाने/आस्थापना (योग्य ती सुरक्षितता राखुन किमान मनुष्यबळासह).

xi) लघु अथवा मध्यम स्वरुपातील अत्यावश्यक उद्योग सेवा जसे पिठाची गिरणी/डाळ निर्मीती/ खाद्य तेलाचे उत्पादन कारखाने.

xii) शैक्षणिक व प्रशिक्षण देणा-या संस्थेच्या बाबतीत ऑनलाईन पध्दतीने Distance Learning चालु ठेवता येईल.

xiii) जिवनाश्यक वस्तु विक्री व वितरण इ. आस्थापना/दुकाने **या व्यतिरिक्त** इतर सर्व प्रकारची आस्थापना/दुकाने (सदर आदेशामधील प्रतिबंधात्मक बाबीमधील अ.क्रं. (viii व ix) मध्ये नमुद असलेली आस्थापना/दुकाने सोडून) **सोमवार ते शनिवार** या दिवशी **सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00** या वेळेत सुरु राहतील व **रविवार ला सदर दुकाने पुर्णत: बंद राहतील**. परंतु आपले दुकान/आस्थापना समोर आणि फुटपाथवर कोणत्याही प्रकारचे साहित्य ठेवता येणार नाही.

xiv) महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत/ग्रामपंचायत यांचेकडुन प्राप्त झालेले परवानाधारक फेरीवाले यांची ठेले/ दुकाने **सोमवार ते शनिवार** या दिवशी **सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00** या वेळेत सुरु राहतील व **रविवारला ला सदर दुकाने पुर्णत: बंद राहतील.**

उपरोक्त प्रमाणे परवानगी देण्यात आलेले कामाचे ठिकाण/सार्वजनिक स्थळी/दुकाने/ आस्थापना/ प्रतिष्ठाने येथे कार्यरत कामगारांस/कर्मचारी तसेच सुविधेचे लाभ घेणारे जिल्हयातील सर्व नागरीक यांनी कायम मास्कचा वापर करणे तसेच आरोग्य सेतु ॲप चा वापर करणे बंधनकारक राहील.

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 271 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सर्व संबधीत यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणा-यां विरुध्द कठोर कारवाई करावी. तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुन केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

उपरोक्त ठिकाणे/कार्यक्रम येथील संबधीत आयोजक तसेच आस्थापना मालक/चालक/ व्यवस्थापक/सर्व संबधीत व्यक्ती यांना प्रत्येकास आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी, प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**सदरचा आदेश संपुर्ण जिल्हयामध्ये दिनांक 01/07/2020 ते दिनांक 31/07/2020 या कालावधीकरिता लागु राहील.**

**सदरचा आदेश प्रतिबंधीत क्षेत्राकरिता (Containment Zone) लागु राहणार नाही.**

**सदरचा आदेश माझे सही व शिक्यानिशी दिनांक 30.06.2020 रोजी निर्गमीत करीत आहे.**

सही/-
**(डॉ. कुणाल खेमनार)**
**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.**

1. मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
4. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
5. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर
6. जिल्हा शल्य चिकीत्सक, सामाण्य रुग्णालय, चंद्रपूर
7. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
8. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. चंद्रपूर
9. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
10. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर
11. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
12. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
13. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
14. सर्व संबधीत विभाग प्रमुख ----------------------------------

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**